राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/पदभरती /२०२३/ 628 दिनांक 07 FEB 2023

प्रति,

प्राचार्य
संचालक/ प्राचार्य
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये

विषय- शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये या संस्थांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार " प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" या योजनेतंर्गत प्राध्यापकांची पदे भरणेबाबत...

संदर्भ- १.उच्च व तंत्रशिक्षण विभाग शानिक्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.(१०/२२)/तांशि-१ दिनांक २९/१२/२०२२
२.संचालनालयाचे पत्र क्र.४/आस्था/तंशिसं/२०२३/१९ दिनांक १७/०१/२०२३

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संदर्भ क्र.१ अन्वये शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये या संस्थांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार " प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" या योजनेतंर्गत प्राध्यापकांची पदे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.२ अन्वये , संबंधित संस्थांना सदर पदे भरणेबाबत कार्यवाही करण्याचे संचालनालयामार्फत सुचित करण्यात आलेले आहे. तद्नुषंगाने आपणांस निर्देशित करण्यात येते की, संबंधित शासन निर्णयातील नमूद मार्गदर्शक तत्वानुसार आपल्या संस्थेसाठी मंजूर करण्यात आलेली "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" ही पदे भरणेबाबत संस्थास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी .

सोबत - संदर्भ क्र.१ व २ छायाप्रती

(डॉ.दत्तात्रय व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०४/४२८,
ई-मेल-desk4@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: ४/आस्था/तंशिसं/२०२३/१९ दिनांक: 17 JAN 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

**विषय:- शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये या संस्थांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" या योजनेअंतर्गत प्राध्यापकांची पदे भरण्याबाबत...**

संदर्भ:- उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र (१०/२२)/तांशि-१, दिनांक २९ डिसेंबर, २०२२

"राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०" अंतर्गत उद्योगक्षेत्र व अथव्यवस्थेची मागणी पूर्ण करण्याकरीता उच्च शिक्षणाचे कौशल्य आधारित शिक्षणामध्ये रुपांतरण करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने औद्योगिक क्षेत्रातील अनुभवी व्यवसायिकांचा शिक्षण क्षेत्रात समावेश करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" हा नवीन उपक्रम सुरू केला आहे.

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयात सद्य:स्थितीत प्राध्यापकांची बऱ्याच प्रमाणात पदे रिक्त आहेत. तसेच सदर पदे भरण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. परंतु सदर योजनेचे उद्दीष्ट विचारात घेता "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" या योजनेअंतर्गत औद्योगिक क्षेत्रातील तज्ञ व्यावसायिकांच्या अनुभवाचा फायदा विद्यार्थ्यांना व शैक्षणिक संस्थांना होणार असल्याने, सदर योजनेअंतर्गत प्राध्यापकांची पदे भरणे फायदेशीर ठरेल. यास्तव, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र संस्थांतील मंजूर पदांच्या १०% च्या प्रमाणात "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" यांची नियुक्ती करण्यास शासनाने संदर्भाधिन शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेली आहे. .. (सोबत शासन निर्णाची छायांकित प्रत जोडली आहे.)

तरी याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, संदर्भाधिन शासन निर्णया सोबतच्या यादीतील शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांना त्यांना मंजूर करण्यात आलेली "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" ही पदे सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार भरण्याबाबतची कार्यवाही करणेबाबत संबंधित संस्थांना आपल्या स्तरावरून सूचित करण्यात यावे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
24 JAN 2023
आवक क्र. 090

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी व औषधनिर्माण संस्थांमध्ये "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" यांची नियुक्ती करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२२/ प्र. क्र. (१०/२२)/तां शि -१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २९ डिसेंबर, २०२२.

वाचा : १) सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग यांचे अ.शा. पत्र क्र. 9-1/2010/(PS/Misc)PT-1, दिनांक ३० सप्टेंबर, २०२२

२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. ४/आस्था/२०२२/९०५, दिनांक २० डिसेंबर, २०२२

प्रस्तावना: "राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०" अंतर्गत उद्योगक्षेत्र व अर्थव्यवस्थेची मागणी पूर्ण करण्याकरिता उच्च शिक्षणाचे कौशल्य आधारित शिक्षणामध्ये रूपांतरण करणे आवश्यक आहे. तसेच, उद्योग-शिक्षण संबंध दृढ करण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्यानुषंगाने, औद्योगिक क्षेत्रातील अनुभवी व्यवसायिकांचा शिक्षण क्षेत्रात समावेश करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" हा नवीन उपक्रम सुरु केला आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापकांची पदे सद्य:स्थितीत बऱ्याच प्रमाणात रिक्त आहेत. तसेच सदर पदे भरण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. परंतु, सदर योजनेचे उद्दीष्ट विचारात घेता प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस या योजनेअंतर्गत औद्योगिक क्षेत्रातील तज्ञ व्यावसायिकांच्या अनुभवाचा फायदा विद्यार्थ्यांना व शैक्षणिक संस्थांना होणार असल्याने सदर योजनेअंतर्गत प्राध्यापकांची पदे भरणे फायदेशीर ठरेल. यास्तव, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी व औषधनिर्माण संस्थांतील मंजूर पदांच्या १०% च्या प्रमाणात "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी तसेच, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांमध्ये "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" यांची नियुक्ती करण्याबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात येत आहेत.

१. "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" नियुक्तीकरिता पात्रता -

१. अभियांत्रिकी, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, प्रसारमाध्यम, समाजशास्त्र, साहित्य, स्थापत्यसेवा, समाजविकास, पंचायतराज, ग्रामीण विकास, जलसंवर्धन, सेंद्रीय शेती, न्यायिक व्यवसाय, नगररचना, लिंगाधारीत अर्थसंकल्प/ नियोजन (Gender Budgeting/ plan), आदिवासी विकास तसेच लोकप्रशासन इ. विविध क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण योगदान दिलेल्या तज्ञ व्यक्तींपैकी, ठराविक व्यवसायामध्ये किमान १५ वर्षांचा अनुभव (प्राधान्याने वरिष्ठ पातळीवरील सेवा/अनुभव) असलेल्या व्यक्ती "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" पदाकरिता पात्र असतील.

२. प्राध्यापक पदाकरिता विहित करण्यात आलेल्या अर्हता "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" करिता आवश्यक असणार असणार नाहीत. तथापि, सदर पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी ठराविक कौशल्ये आत्मसात केलेली असावीत.

३. उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रोफेसर्स ऑफ प्रॅक्टीस ची संख्या मंजूर पदांच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त असूनये.

२. कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या:

१. सदर योजनेअंतर्गत नियुक्त प्राध्यापकांना किमान एक विषय शिकविणे आवश्यक आहे. सदर प्राध्यापकांनी तिसऱ्या व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना शिकविणे व नियमित प्राध्यापकांकरिता नेमून दिल्याप्रमाणे शैक्षणिक भार घेणे आवश्यक राहील. तसेच विद्यार्थ्यांचे प्रकल्प (प्रोजेक्ट), मूल्यमापन व सत्र काम पूर्ण करणे आवश्यक राहील.

२. अभ्यासक्रमात गरजेनुसार बदल करणे आणि नवीन अभ्यासक्रम निर्माण करणे (Course Design) या मध्ये सहभागी होणे.

३. संस्थेच्या धोरणानुसार नवीन अभ्यासक्रम निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांना शिकवणे.

४. विद्यार्थ्यांना संशोधन आणि स्वयंरोजगार याबाबत प्रोत्साहन देणे.

५. शैक्षणिक संस्था आणि उद्योगसमूह यामधील परस्पर संबंध वृध्दींगत करणे.

६. संस्थेतील अध्यापकांसोबत संयुक्तपणे संशोधनपर प्रकल्प राबविणे तसेच उद्योगांना सल्लागार सेवा पुरविणे (Consultancy Services) संबंधी कामे.

७. संस्थेच्या अध्यापकांसोबत संयुक्तपणे कार्यशाळा (workshop), परिसंवाद (Seminar), विशेष व्याख्याने या सारखे उपक्रम राबविणे.

३. सर्वसाधारण अटी व शर्ती :

१. सदर योजनेअंतर्गत प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस या पदावरील नियुक्त्या ठराविक कालावधीकरिता असतील.

२. सदर नियुक्त्यांमुळे संस्थांमधील मुळ मंजूर पदांच्या आकृतीबंधामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. तसेच सदर पदांमुळे नियमित अध्यापकांच्या नियुक्त्यांवर कोणत्याही प्रकारचा परिणाम होणार नाही.

३. सदरच्या नियुक्त्या नियमित अध्यापकीय सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांमधून करता येणार नाहीत.

४. नियुक्तीचे प्रकार:-

विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केल्यानुसार "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" या पदावरील नियुक्त्या पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे करता येतील.

१. औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकाच्या प्रायोजक निधी (Funded By Industries)

२. उच्च शिक्षण संस्थांच्या स्वत:च्या उपलब्ध निधी (HEI- Own Resources)

३. मानधन तत्त्वावर (Honorary basis)

प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस या पदा करिता येणारा खर्च उद्योग प्रायोजित/ संस्थास्तरावर उपलब्ध निधीतून भागविण्यात येईल. याबाबत शासनाकडून कोणत्याही प्रकारे निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही.

५. "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस"या पदाकरीता निवड करण्याची पध्दत

१. विद्यापीठाचे कुलगुरू/ संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य वृत्तपत्रामध्ये जाहीरात देऊन प्रख्यात तज्ञांकडून "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस" पदांसाठी नामांकन मागवतील

२. इच्छुक व पात्र असलेले इतर तज्ञ यांचे देखील नामांकन करता येऊ शकेल किंवा तज्ञ व्यक्ती त्यांच्या वैयक्तिक माहितीसह उच्च शि क्षण संस्थेस भरीव योगदानाच्या माहितीसह नामांकन अर्ज विद्यापीठाचे कुलगुरू/ संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य यांना सादर करू शकतील.

६. नियुक्तीकरिता निवड समिती:

१. संस्थेतील दोन वरिष्ठ प्राध्यापक (संबंधित विषयातील) आणि संस्थेबाहेरील एक प्रख्यात तज्ञ सदस्य यांची निवड समिती गठीत करण्यात येईल.

२. सदर समितीच्या शिफारशींच्या आधारे, संस्थेतील प्रशासकीय परिषद (Academic Council) आणि कार्यकारी परिषद (Executive Council) किंवा वैधानिक समिती (Statutory bodies) निवडीसंबंधी निर्णय घेईल.

७. कार्यकाळ :

१. नियुक्त "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" यांचा कार्यकाळ सुरुवातीस एका वर्षाकरिता राहील.

२. कार्यरत प्राध्यापकांचा पहिला कार्यकाळ पूर्ण होताना किंवा तद्नंतर मुदतवाढ देतेवेळी संबंधित संस्था मूल्यमापन करुन निर्णय घेईल.

३. प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस म्हणून नियुक्त तज्ञांचे योगदान व मागणीनुसार संबंधित संस्था मुदतवाढ देण्याकरिता स्वतंत्रपणे मूल्यमापन प्रक्रिया ठरवील.

४. सदर मुदतवाढ ही सत्रनिहाय जास्तीत जास्त ३ वर्षांची राहील. अपवादात्मक परिस्थितीमध्ये एक वर्ष अधिकची मुदतवाढ देता येईल. तथापि कोणत्याही परिस्थि तीत एकूण सेवा ४ वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

८. संस्था निहाय प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस यांच्या नियुक्ती करिता उपलब्ध पदांचा तपशिल सोबतच्या विवरणपत्र अ,ब, क, व ड यामध्ये नमुद करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सतिश ज.तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
५. प्राचार्य/ संचालक, सर्व शासकीय/ अशासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत)
६. प्राचार्य/ संचालक, सर्व शासकीय/ अशासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत)
८. सह सचिव (सा. शि. ) / उप सचिव (म. शि. )/ उप सचिव ( वि. शि. )
९. निवड नस्ती/तांशि-१

## विवरणपत्र अ

### शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये

| अ. क्र. | संस्थेचे नाव | प्राध्यापक मंजूर पदे | प्राध्यापक भरलेली पदे | प्राध्यापक रिक्त पदे | १० टक्के प्रमाणे येणारी प्राध्यापकांची पदे | अंदाजित एका सत्राकरिता आर्थिक भार (अंदाजे १.५० लाख प्रति माह प्रति व्यक्ती याप्रमाणे ४ महिने) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, रत्नागिरी | ३ | ० | ३ | ० | -- |
| २ | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी | ९ | ४ | ५ | १ | ६ लक्ष |
| ३ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड | ७ | ३ | ४ | १ | ६ लक्ष |
| ४ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव | ७ | १ | ६ | १ | ६ लक्ष |
| ५ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | ८ | १ | ७ | १ | ६ लक्ष |
| ६ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती | ८ | २ | ६ | १ | ६ लक्ष |
| ७ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ | ६ | १ | ५ | १ | ६ लक्ष |
| ८ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर | ७ | ० | ७ | १ | ६ लक्ष |
| ९ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर | ६ | ० | ६ | १ | ६ लक्ष |
| | एकूण | ६१ | १२ | ४९ | ८ | ४८ लक्ष |

विवरणपत्र ब

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये

| अ. क्र. | संस्थेचे नाव | प्राध्यापक मंजूर पदे | प्राध्यापक भरलेली पदे | प्राध्यापक रिक्त पदे | १० टक्के प्रमाणे येणारी प्राध्यापकांची पदे | अंदाजित एका सत्राकरिता आर्थिक भार (अंदाजे १.५० लाख प्रति माह प्रति व्यक्ती याप्रमाणे ४ महिने) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, रत्नागिरी | १ | ० | १ | ० | -- |
| २ | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड | २ | ० | २ | १ * | ६ लक्ष |
| ३ | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती | २ | १ | १ | ० | -- |
| ४ | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद | २ | १ | १ | ० | -- |
| | एकूण | ७ | २ | ५ | १ | ६ लक्ष |

*--औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांतील स्वतंत्र मंजूर पदे विचारात घेता १० टक्के प्रमाणे पद उपलब्ध होत नाही. परंतु सर्व महाविद्यालयांतील एकूण पदे विचारात घेता १० टक्के प्रमाणे १ पद उपलब्ध होते. सदर पद शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड या संस्थेमध्ये भरण्यात यावे.

## विवरणपत्र क

## अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये

| अ. क्र. | संस्थेचे नाव | प्राध्यापक मंजूर पदे | प्राध्यापक भरलेली पदे | प्राध्यापक रिक्त पदे | १० टक्के प्रमाणे येणारी प्राध्यापकांची पदे | अंदाजित एका सत्राकरिता आर्थिक भार (अंदाजे १.५० लाख प्रति माह प्रति व्यक्ती याप्रमाणे ४ महिने) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई | ४ | ४ | ० | ० | -- |
| २ | व्ही.जे.टी.आय. मुंबई | ११ | ५ | ६ | १ | ६ लक्ष |
| ३ | श्री. गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, नांदेड | १३ | २ | ११ | १ | ६ लक्ष |
| ४ | वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली | ७ | ६ | १ | ० | ० |
| | एकूण | ३५ | १७ | १८ | २ | १२ लक्ष |

## विवरणपत्र ड

## अशासकीय अनुदानित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये

| अ. क्र. | संस्थेचे नांव | प्राध्यापक मंजूर पदे | प्राध्यापक भरलेली पदे | प्राध्यापक रिक्त पदे | १० टक्के प्रमाणे येणारी प्राध्यापकांची पदे | अंदाजित एका सत्राकरिता आर्थिक भार (अंदाजे १.५० लाख प्रति माह प्रति व्यक्ती याप्रमाणे ४ महिने) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बॉम्बे कालेज ऑफ फार्मसी, मुंबई | २ | ० | २ | ० | -- |
| २ | के.एम.कुंदनानी कॉलेज ऑफ फार्मसी | २ | १ | १ | ० | -- |
| ३ | सी यु शाह कॉलेज ऑफ फार्मसी | १ | ० | १ | ० | -- |
| ४ | म.वि.प्र.स. कॉलेज ऑफ फार्मसी | २ | १ | १ | ० | |
| | भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी | २ | १ | १ | ० | -- |
| | एकूण | ९ | ३ | ६ | ० | ० |